REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 11 | AUGUST - 2023

# "पुणे जिल्हा नियोजनाची संतुलित क्षेत्रीय विकासातील भूमिका"

**डॉ.आप्पासो मछिंद्र काळेल**
**सहाय्यक प्राध्यापक, अर्थशात्र विभाग, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे.**

## प्रस्तावना :



नियोजनाचे विकेंद्रिकण करताना जिल्हा हा नियोजनाचा घटक म्हणुन स्विकारणे स्वाभाविक आहे. जिल्ह्याचा समतोल विकास साधणे हा जिल्हा नियोजनाचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात जिल्हा नियोजनाचा आधारभूत घटक मानून विकेंद्रित नियोजनाची प्रक्रिया १९७४ पासून करण्यात आली. ज्याप्रमाणे देश पातळीवर नियोजन आयोग नियोजनाचे कार्य करते (सध्या निती आयोग) त्याप्रमाणे राज्यपातळीवरील राज्यनियोजन मंडळ नियोजन कार्य करते. तर जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन मंडळाकडून नियोजन केले जाते. १९९२ च्या संविधानाच्या ७४ वी घटना दुरुस्ती अनुच्छेद २४३ (व) नुसार राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्या स्थापन करण्याबाबत संदर्भ आहे. या संवैधानिक तरतुदीनुसार महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन क्षेत्रात बदल करण्यात आला व हा अधिनियम दिनांक १५ मार्च १९९९ पासून आमलात आला. तेव्हा पासून प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्यात आली. नियोजनाचे विकेंद्रिकरण करून स्थानिक पातळीवरील नियोजन करुन उपलब्ध जिल्हा नियोजन समितीची भूमिका महत्वाची ठरते.

## जिल्हा नियोजनाची व्याख्या :

नियोजन आयोगाच्या मते, 'जिल्हा नियोजन हे स्थानिक विकासाचे व गरजांच्या पूर्ततेचे एक साधन आहे.'

## जिल्हा नियोजनाचे महत्व :

जिल्हा पातळीवरील साधने, क्षमता आणि समस्या यांचा सखोल अभ्यास करुन राज्य व देशपातळीवरील नियोजनाला पुरक म्हणुन जिल्हा नियोजन आमलात आणले जाते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याच्या गरजा स्वतंत्रपणे विचारात घेता येतात.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यामते, जनतेचा सहभाग ही नियोजनातील आवश्यक बाब जिल्हा पातळीवरच साध्य करता येते. नियोजन हे जनतसाठी आहे, हे जिल्हा पातळीवर जास्त प्रभावीपणे पटवून देता येते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जिल्हा नियोजन हा आर्थिक उपक्रम आवश्यक आहे. जिल्हा नियोजनामध्ये कृषि, उद्योग व सेवा या तिन्ही क्षेत्राच्या विकासावर भर दिला जातो. त्यामुळे या क्षेत्रांच्या संबंधीत योजना तयार करुन त्या स्थानिक पातळीवर राबविल्या जातात. यातून स्थानिक पातळीचा विकास होऊन क्षेत्रिय विकास होण्यास मदत होते.

### जिल्हा नियोजन समितीची उद्दिष्टे :

१) जिल्हा वार्षिक नियोजन प्रारुप आराखडा तयार करणे.
२) जिल्ह्यातील तालुक्या तालुक्यातील असमतोल दूर करणे.
३) विविध योजनावरील खर्चाचा आढावा घेणे.
४) पुनर्विनियोजन प्रस्ताव तयार करणे.

### संशोधनाची उद्दिदष्ट्ये :

१) जिल्हा नियोजनाची संकल्पना जाणून घेणे.
२) जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील जिल्हा नियोजनाची भूमिका अभ्यासणे.
३) जिल्ह्याच्या संतुलित क्षेत्रीय विकास घडवून आणण्यामध्ये जिल्हा नियोजनाच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे.

### संशोधनाची गृहिते :

१) जिल्हा नियोजनामुळे जिल्ह्याचा संतुलित आर्थिक विकास होत आहे.

### संशोधन पध्दती :

संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोताचा वापर करुन माहिती मिळविली आहे.

### १) प्राथमिक स्रोत :

प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहितीचे संकलन केले आहे. यामध्ये ३८० लाभार्थींची प्रश्नावली भरुन घेतली आहे.

### २) द्वितीय स्रोत :

यामध्ये महाराष्ट्राचे आर्थिक पहाणी अहवाल, पुणे जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक पहाणी अहवाल, वर्तमानपत्रातील विविध लेख, विविध नियतकालिके, विविध मासिके, संदर्भ पुस्तके, संशोधन प्रबंध, विविध वेबसाईट्स, यशवंतराव चव्हाण विकास व प्रशासन प्रबोधिनी (यशदा, पुणे), भारतीय सांख्यिकीय विभागाचा अहवाल, अर्थसंवाद गोखले इन्स्टिट्युट, पुणे, भारतीय शिक्षण संस्था, आबासाहेब गरवारे कॉलेजचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे ग्रंथालय इत्यादी साधनांचा वापर या संशोधनासाठी केला आहे.

### पुणे जिल्हा नियोजनातील विकास क्षेत्रे व त्यांची उपक्षेत्रे :

जिल्हा नियोजनात प्रमुख नऊ क्षेत्राचा समावेश होतो. या नऊ विकास क्षेत्राची विभागणी २ भागात केली जाते. या नऊ क्षेत्रासाठी जिल्हा नियोजनाकडून योजनांचा विकास आराखडा तयार केला जातो. नऊ विकास क्षेत्राची पुढील दोन भागात विभागणी होते.

### अ) गाभा क्षेत्रे :

गाभा क्षेत्रामध्ये कृषि व संलग्न सेवा, ग्रामीण विकास, सामाजिक व सामुहिक सेवा या तीन मुख्य क्षेत्राचा समावेश होतो.

### ब) बिगर गाभा क्षेत्रे :

बिगर गाभा क्षेत्रामध्ये ऊर्जा विकास, उद्योग व खाणकाम, परिवहन, पाटबंधारे व पुरनियंत्रण, सामान्य सेवा व सामान्य आर्थिक सेवा या सहा क्षेत्राचा समावेश होतो.

## पुणे जिल्हा नियोजनाकडून विकास क्षेत्रावर केलेल्या खर्चाचा तपशील

पुणे जिल्हा नियोजनाकडून विकास क्षेत्रावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा तपशील पुढील तक्त्यात स्पष्ट केला आहे.

तक्ता क्र. १.१

| अ.क्र. | विकास क्षेत्रे | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०११ २०१२ | | २०१२ १३ | |
| | | मंजूर खर्च | प्रत्यक्ष खर्च | मंजूर खर्च | प्रत्यक्ष खर्च |
| १. | कृषि व सलग्न सेवा | ३५१७.२४ | ३७०८.१४ | ३७७३.२४ | ४३६२.९३ |
| २. | ग्रामणी विकास | १९५१.६३ | १८१४.२८ | १८८४.५९ | १८६४.६५ |
| ३. | पाटबंधारे व पुरनियंत्रण | १८६९.०० | १८५९.७४ | १६४९.०८ | १८३७.४४ |
| ४. | ऊर्जा | ६१६.५० | ६७४.८९ | ९३६.६० | ९५५.२७ |
| ५. | उद्योग व खाणकाम | २२१.५० | १३७.२७ | २३३.५० | १६३.१८ |
| ६. | परिवहन | ५१०८.१९ | ७२१९.९७ | ८३८६.५० | ८८५६.८२ |
| ७. | सामान्य आर्थिक सेवा | १२१६.७० | १३२६.७० | १३९०.०० | १४५०.०० |
| ८. | सामाजिक सामुहिक सेवा | १००९५.२५ | ९५९०.२५ | १०३५१.४९ | ९६६३.९३ |
| | एकूण सामान्य सेवा | ३९०४.०० | २०२४.१७ | २२९५.०० | १७१३.२५ |
| | **एकूण** | **२८५००.०१** | **२८३५५.४१** | **३०९०१.००** | **३०८६७.४७** |

**संदर्भ :** जिल्हा नियोजन समिती, पुणे जिल्हा , वार्षिक अहवाल माहिती पुस्तीका २०११ १२, २०१२ २०१३

वरील तक्ता क्र. १.१ नुसार असे दिसून येते की, जिल्हा नियोजनाकडून विकासक्षेत्रावर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये वाढ होताना दिसते. २०११ १२ मध्ये २८५००.०१ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. तर प्रत्यक्ष खर्च २८३५५.४१ लाख रुपये झाल्याचे दिसून येते. तर २०१२ १३ मध्ये खर्चामध्ये वाढ होऊन मंजुर खर्च ३०९०१ लाख रुपये झाला आहे. तर प्रत्यक्ष खर्च ३०८६७.४७ लाख रुपये झाल्याचे दिसून येते. २०११ १२ व २०१२ २०१३ या दोन्ही वर्षी मंजुर व प्रत्यक्ष खर्च वाढत गेल्याचे दिसून येते. यावरुन असे स्पष्ट होते की, जिल्हा नियोजनाकडून प्रत्येक विकास क्षेत्रावर केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ केली आहे. यामुळे या नऊ विकास क्षेत्राचा विकास होताना दिसून येतो.

## पुणे जिल्हा नियोजनातील योजनांच्या लाभामुळे लाभार्थींच्या उत्पन्ना झालेली घट वाढीनुसार वर्गीकरणः

संतुलित क्षेत्रीय विकासातील पुणे जिल्हा नियोजनाच्या भूमिकेचे मूल्यमापन करताना द्वितीय सामग्रीबरोबरच प्राथमिक सामग्रीचाही वापर केला आहे. यामध्ये जिल्हा नियोजनाकडून आखल्या जाणाऱ्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेणाऱ्या लाभार्थिंची प्रश्नावली भरुन घेतली. विविध योजनांच्या लाभामुळे लाभार्थींच्या उत्पन्नात काय बदल झाला याचा अभ्यास केला आहे. याठिकाणी कृषि व संलग्न सेवा या एकाच क्षेत्राचा विचार केला आहे. पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातून सर्वसाधारण लाभार्थींच्या ३८० प्रश्नावल्या भरुन घेतल्या आहेत. शासनाच्या मिळालेल्या योजनांमुळे उत्पन्नातील वाढ व वार्षिक उत्पन्नात झालेल्या वाढीचे वर्गीकरण पुढील तक्त्यावरुन स्पष्ट केले आहे.

**जिल्हा नियोजनातील मिळालेल्या योजनामुळे उत्पन्नात वाढ झाली आहे का? यानुसार वर्गीकरण.**

**तक्ता क्र. १.२**

| अ.क्र. | तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३१० | ८१.५८ |
| २. | नाही | ७० | १८.४२ |
| | **एकूण** | **३८०** | **१००** |

**संदर्भ :** क्षेत्रीय पहाणी

जिल्हा नियोजनातील मिळालेल्या योजनामुळे उत्पन्नात झालेल्या वाढ किंवा घटीची पहाणी करण्यासाठी ३८० सर्वसाधारण लाभार्थींना प्रश्न विचारण्यात आले. तक्त क्र. १.२ वरुन असे दिसून येते की, ३१० लाभार्थींनी शासनाच्या योजनेमुळे उत्पन्नात वाढ झाल्याचे सांगितले. हे प्रमाण ८१.५८% इतके आहे. तर ७० लाभार्थींनी शासनाच्या योजनेमुळे उत्पन्नात वाढ झाली नाही असे सांगितले. हे प्रमाण १८.४२% इतके आहे. यावरुन असे दिसते की, जिल्हा नियोजनातील योजनामुळे लाभार्थींच्या उत्पन्नात वाढ होते. या वरुन असा निष्कर्ष निघतो की, जिल्हा नियोजनातील योजना विकास क्षेत्राचा विकास करण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत आहे. यामुळे क्षेत्रीय विकास होण्यास मदत होताना दिसून येते.

**जिल्हा नियोजनातील दोष व समस्या :**

जिल्हा नियोजनामध्ये विविध घटक उदा. शासकिय यंत्रणा, बँका, सरपंच, ग्रामसेवक, सभापती जिल्हा नियोजन समितीचे अधिकारी यांच्या योजना अंमलबजावणीच्या विविध टप्प्यावर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी काही महत्वाच्या समस्या पुढील प्रमाणे.

१) जिल्हा नियोजनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टाप्रमाणे कार्य करीत असली तरी उद्दिष्ट्ये पूर्ततेची कार्यपध्दती जास्त किचकट आहे. यामुळे गरजू लाभार्थी पर्यंत ही यंत्रणा पोहचत नाही.

२) जिल्हा नियोजन अधिकारी ते सरपंच व ग्रामसेवक हे लोकांपर्यंत शासनाच्या योजना पोहचवत नाहीत हा मुख्य दोष आहे.

३) जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांना पालक मंत्री बऱ्याच वेळा अनुपस्थितीत असतात. त्यामुळे निर्णय घेण्यामध्ये समस्या निर्माण होतात.

४) जिल्हा नियोजनामध्ये खऱ्या गरजू कडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष होते. गरज नसणाऱ्यांना योजनेचा जास्त लाभ मिळतो.

५) जिल्हा नियोजन समिती केंद्र व राज्य सरकारच्या अग्रक्रमाच्या योजनासाठी असलेल्या तरतुदीच्या आधारावर जिल्हा नियोजन करीत असल्यामुळे स्थानिक उत्पादन घटक आणि स्थानिक गरजांच्या अग्रक्रमाकडे दुर्लक्ष होते.

**शिफारशी :**

पुणे जिल्हा नियोजनाची सध्याची कार्यपध्दती, समस्या व दोष लक्षात घेता जिल्हा नियोजनातील योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पुढील शिफारशी सांगता येतील.

१) जिल्हा नियोजन यशस्वी होण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रतिनिधी यांनी सामान्य जनतेला नियोजनाचे लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

२) जिल्हा नियोजन अधिक यशस्वी होण्यासाठी तालुक्यामध्ये विकास केंद्रे स्थापन केली पाहिजेत.

३) जिल्हा नियोजनाकडून लाभार्थींना मिळणारे लाभ हे दिर्घकालीन असले पाहिजेत की जेणेकरुन त्यांच्या विकासास हातभार लागू शकेल.

४) जिल्हा नियोजनामध्ये जनतेच्या सहभाग वाढवून जिल्हा नियोजनातील योजना जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी शासकीय यंत्रणा बळकट करणे आवश्यक आहे.

५) ज्या विकास क्षेत्रामध्ये अधिक लोकसंख्या कार्यरत आहे. त्या क्षेत्राला अधिक निधी मंजुर करुन घेतला पाहिजे.

**समारोप :**

जिल्हा नियोजन हे समतोल विकास साधण्याचे महत्वाचे साधन आहे. तरी सुध्दा जिल्हा नियोजनापुढे आव्हाने, दोष व समस्यामुळे जिल्हा नियोजनाला अपेक्षित यश मिळत नाही. राजकीय हस्तक्षेप आणि यंत्रणेच्या प्रभावामुळे योजनांचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचत नाही. यामुळे शासनाने योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजनामध्ये नऊ विकास क्षेत्रे समोर ठेऊन नियोजन केले जाते. वेगवेगळ्या लोकांपर्यंत या योजना पोहचणे आवश्यक आहे. असे केल्याने जिल्ह्याचा संतुलित क्षेत्रीय विकास होण्यासाठी मदत होईल.

**संदर्भ :**

१) दत्त व सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था एस.चंद प्रकाशन, नवी दिल्ली २०११ २०१२.
२) र.पु. कुरुलकर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, २००५, पृ.क्र. ७९, ८०.
३) जिल्हा नियोजन समिती, पुणे जिल्हा, जिल्हा वार्षिक योजना माहिती पुस्तिका २०११ १२ व २०१२ १३.
४) रामदास य. माहोर महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन अर्थसंवाद (२००६ जानेवारी मार्च) खंड ९, अंक ४, पृ.क्र.३५४.
५) क्षेत्रीण पहाणी.
६) महाराष्ट्र शासन अधिनियम, दिनांक १५ मार्च १९९९ मुंबई.